04 JUN २०२५
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'यिन'मधून लोकशाहीचे खरे नायक घडतील

## खासदार धैर्यशील माने : 'सकाळ यिन समर यूथ समीट'ला विद्यापीठात प्रारंभ


■ सकाळ वृत्तसेवा




कोल्हापूर, ता. ३ : समाजाच्या विविध क्षेत्रांत सकारात्मक बदल घडविण्यात योगदान देणारी नवी पिढी घडविण्याचे महत्त्वपूर्ण काम 'यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क'च्या (यिन) माध्यमातून सकाळ माध्यम समूह करत आहे. बदलत्या राजकारणात उपेक्षितांचे प्रश्न सोडविण्यासह राष्ट्रविकासात खणखणीतपणे योगदान देणारे लोकशाहीचे खरे नायक या माध्यमातून निश्चितपणे घडतील, असा विश्वास खासदार धैर्यशील माने यांनी आज येथे व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात 'यिन समर यूथ समीट-२०२५'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते; तर सकाळचे संपादक निखिल पंडितराव, सरव्यवस्थापक (दक्षिण महाराष्ट्र) यतीश शहा, 'पीसीसीओइआर'च्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. समीर सावरकर, संजय घोडावत विद्यापीठाचे विश्वस्त विनायक भोसले,

पान ५ वर ›




### माने यांचा तरुणाईला सल्ला

- 'एआय'च्या जगात ओरिजिनल इंटेलिजन्स हरवू नका
- संवाद कौशल्य वाढवा, चुका-अनुभवातून शिका
- जितके नम्र, जागरुक राहाल, तितके मोठे व्हाल
- अभ्यासपूर्ण प्रयत्नातून स्वतःचे विश्व निर्माण करा
- मिळालेल्या संधीचे सोने करा, कर्मावर विश्वास ठेवा
- स्वतःपुरता विचार सोडा, टीमवर्क करा. उद्देश स्पष्ट ठेवा
- वैचारिक उंची घसरणार नाही याची काळजी घ्या

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUN 2025
सकाळ

# 'यिन'मधून लोकशाहीचे खरे नायक घडतील

> पान १ वरून

योग-आहार व उंची विशेषज्ञ डॉ. पियू धनवडे, विद्या प्रबोधिनीचे संचालक राजकुमार पाटील प्रमुख उपस्थित होते. या 'समीट'चे मुख्य प्रायोजक डॉ. पियू हाईट क्लिनिक, तर पॉवर्ड बाय पिंपरी चिंचवड युनिव्हर्सिटी आहे. विद्याप्रबोधिनी कोल्हापूरचे सहकार्य असून ट्रिनिटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, फ्युएल बिझनेस स्कूल, महा एनजीओ फेडरेशन सहप्रायोजक, तसेच शिवाजी विद्यापीठ व्हेन्यू, संजीवन नॉलेज सिटी (पन्हाळा) हॉस्पिटॅलिटी, तर जनता सहकारी बँक लिमिटेड बँकिंग पार्टनर आहे.

विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचे मार्गदर्शन, उत्साही वातावरणात तरुणाईच्या उत्सवाचा प्रारंभ झाला. खासदार श्री. माने यांनी 'तळागाळातील सामान्यांशी नाळ जोडून स्वतःवर विश्वास ठेवून कार्यरत राहिल्याने ग्रामपंचायत सदस्य ते खासदारपदापर्यंत पोहोचलो. त्यामुळे कोणत्याही क्षेत्रात करिअर करताना आत्मविश्वासाने कार्यरत राहा', असा सल्ला दिला. 'राजकारणातील संवेदनशीलता संपून त्यात 'प्रॅक्टिकल'पणा वाढत आहे. राजकारण हे इतर क्षेत्रांपेक्षा पवित्र क्षेत्र आहे. मात्र, त्याचे पावित्र्य जपणारे लोक या क्षेत्रात येत नसल्याची खंत आहे. प्रत्येक क्षेत्रात 'यंग इन्स्पिरेटर्स' घडविण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम 'सकाळ' राबवित असून त्यातून निश्चितपणे लोकशाही, राजकीय क्षेत्रातील खरे नायक घडतील', असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'आयात-निर्यातीच्या प्रमाणावर विकसित की, विकसनशील देश ठरतो. अजूनही आपल्या देशातील आयातीचे प्रमाण अधिक असून, ते विकसित भारतासाठी ते कमी करणे आवश्यक आहे. त्यासाठी जे काही करायचे ते उच्च शिक्षणातून लक्षात घेऊन आपल्याला मार्गक्रमण करावे लागणार आहे. विकसित भारत म्हणजे अर्थ, निसर्ग, सुविधा, आरोग्य, बौद्धिक संपन्न असणे आहे. ही संपन्नता साधण्यासाठी तरुणाईचे योगदान खूप महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने तरुणाईला शिक्षणातून दिशा द्यावी लागणार आहे. राष्ट्र उभारणीत योगदान देताना युवापिढीने सामाजिक बांधिलकी जपावी. ओरिजनल वर्क करणाऱ्यांना कुणीही रोखू शकत नाही. त्यामुळे 'कॉपी-पेस्ट' टाळून नवसंशोधनाला प्राधान्य द्या. अभ्यासातून पुढे वाटचाल करा.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी अमृता पवार यांनी गणेशवंदना सादर केली. प्रमुख उपस्थितांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. 'सकाळ'चे संपादक श्री. पंडितराव यांनी प्रास्ताविक केले. सकारात्मक सामाजिक बदल घडविणारी नवीपिढी घडविण्याच्या उद्देशाने 'सकाळ'ने 'यिन'ची सुरुवात केली. भारतीय संस्कृती, मूल्यव्यवस्थेची जपणुकीसह आहार, मानसिक आरोग्य सदृढ राखण्याबाबत तरुणाईला मार्गदर्शन केले जाते. त्याचा चांगला परिणाम घडला असून, तरुणाई केवळ 'रील'मध्ये नसून समाजासाठी 'रिअल' काम करत असल्याचे 'यिन' ने दाखवून दिले. तरुणाईने 'हेड, हार्ट, हँड' यांचा चांगला वापर केल्यास निश्चितपणे सकारात्मक बदलाचे प्रमाण आणखी वाढणार असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. सावरकर, डॉ. धनवडे, श्री. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. 'यिन'ला सहकार्य करणाऱ्या प्रा. प्रवीण घेवारी, डॉ. रामचंद्र गुरव, जयदीप शिंदे, दिग्विजय पवार, संग्राम डोपारे, निखिल पाटील, सुहास लकडे, साहिल मुल्लाणी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. 'यिन'चे महाराष्ट्र व्यवस्थापक श्यामसुंदर माडेवार यांनी आभार मानले. प्रभंजन नलवडे यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUN 2025
लोकमत




कोल्हापुरात शुक्रवारी प्रा. डॉ. गोपाळ गावडे आणि इंद्रायणी गावडे यांचा प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पै. विष्णू जोशीलकर, मनोज जाधव, डॉ. विनोद कांबळे उपस्थित होते.

# गावडे यांचा वेटर ते डॉक्टर प्रवास खडतर : पी. एस. पाटील

## 'मराठी प्रेम कविता : अस्तित्ववादी दृष्टिकोनातून' पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** डॉ. गोपाळ गावडे यांनी प्रतिकूल परिस्थितीत खडतर वाटचाल करून वेटर ते प्राध्यापक डॉक्टर असा उच्चतम प्रवास करून शिक्षण क्षेत्रात आदर्श निर्माण केला, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

महावीर महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. गोपाळ गावडे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त त्यांच्या हस्ते 'मराठी प्रेम कविता : अस्तित्ववादी दृष्टिकोनातून' पुस्तकाचे प्रकाशन झाले. यावेळी त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र केसरी पै. विष्णू जोशीलकर अध्यक्षस्थानी होते.

यावेळी महावीर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. उषा पाटील, प्रा. रामचंद्र गावडे, अमेय गावडे यांनी मनोगत व्यक्त केले. ताज मुल्लानी यांनी मानपत्र वाचन केले. यावेळी डॉ. अरुण काकडे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अरुण पाटील, डॉ. जी. पी. माळी, रामनाथ आचार्य उपस्थित होते. डॉ. गावडे यांच्या जीवनावर आधारित लघुपट दाखविण्यात आला. डॉ. विनोद कांबळे यांनी प्रास्ताविक केले.

04 JUN २०२५

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत परीक्षा सुरळीत

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठांतर्गत मार्च–एप्रिल २०२५ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी बीए., बीएस्सी., एमबीए, पी. जी. डी. सी. ए., बी. टेक., एम. टेक., पीजी डिप्लोमा इन इंटरनॅशन रिलेशन ॲण्ड सिक्युरिटी स्टडीज, डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी हेल्थ ॲण्ड एन्व्हारमेंट, एम. सी. ए., एम. एड, पी. जी. डिप्लोमा इन एन्व्हारमेंटल प्रोटेक्शन ॲण्ड मॅनेजमेंट, एम. सी. ए. अशा २७ अभ्यासक्रमाची १८२ परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पार पडली. ५ हजार ८०५ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. आतापर्यंत झालेल्या परीक्षांपैकी ३५९ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले. त्यामुळे विद्यार्थ्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

0 4 JUN 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मटेरियल सायन्समध्ये देशातील 'टॉप-१०' संशोधकांत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील

## शिवाजी विद्यापीठाचा शोधनिष्ठेचा राष्ट्रीय गौरव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



मटेरियल सायन्स क्षेत्रामध्ये शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू व जागतिक कीर्तीचे संशोधक डॉ. पी. एस. पाटील यांचा देशातील आघाडीच्या दहा संशोधकांमध्ये समावेश झाला आहे. 'रिसर्च डॉट कॉम' या आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन मंचाने नुकतीच २०२४ ची यादी जाहीर केली असून, त्यामध्ये डॉ. पाटील यांना मटेरियल सायन्समध्ये देशात नववे स्थान मिळाले आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या नावावर ६०० हून अधिक शोधनिबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकांत प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या संशोधनास अद्यापपर्यंत ३३,८८० हून अधिक सायटेशन्स मिळाल्या असून, त्यांचा एच-इंडेक्स ९४, आय-१० इंडेक्स ५४० आणि डी-इंडेक्स ८८ इतका आहे. जागतिक क्रमवारीत त्यांना मटेरियल सायन्स क्षेत्रात १,५१२ वे स्थान मिळाले आहे. त्यांच्या नावावर सात पेटंट आहेत, तर चार आंतरराष्ट्रीय संशोधनविषयक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पूर्ण केली असून, अनेक पुरस्कारांनी गौरविले आहे. त्यांचा समावेश अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या टॉप दोन टक्के संशोधकांच्या यादीतही झाला आहे.

मटेरियल सायन्स हे माझ्या आवडीचे संशोधनाचे क्षेत्र आहे. त्यामुळे दर्जेदार संशोधन करणे शक्य झाले. आकडेवारीपेक्षा सातत्यपूर्ण संशोधन अधिक महत्त्वाचे वाटते. या क्षेत्रात भविष्यातही अधिक संशोधन करण्याचा प्रयत्न राहील.

**- डॉ. पी. एस. पाटील, प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ**

डॉ. पी. एस. पाटील यांचे यश केवळ त्यांच्या वैयक्तिक परिश्रमांचे प्रतीक नसून, शिवाजी विद्यापीठ परिवारासाठी, तसेच भारतीय विज्ञान क्षेत्रासाठीही अभिमानास्पद आहे. त्यांच्या यशामुळे विद्यापीठाची प्रतिष्ठा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर उंचावली आहे. हे यश युवा संशोधकांना प्रेरणा देणारे ठरेल.


**- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUN 2025
सकाळ

# देशातील 'टॉप-१०' संशोधकांत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील

कोल्हापूर, ता. ३ : मटेरियल सायन्समध्ये देशातील आघाडीच्या दहा संशोधकांमध्ये शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू तथा जागतिक कीर्तीचे संशोधक डॉ. पी. एस. पाटील यांचा समावेश झाला. 'रिसर्च डॉट कॉम'ने २०२४ ची विविध विषयांतील जागतिक आघाडीच्या संशोधकांची यादी नुकतीच जाहीर केली. त्यामध्ये डॉ. पाटील देशात नवव्या स्थानी आहेत.

मटेरियल सायन्समधील संशोधनाच्या अनुषंगाने प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांचे विविध संशोधकीय निर्देशांक उच्च दर्जाचे आहेत. त्यांच्या संशोधनाचा एच-इंडेक्स ९४, आय-१० इंडेक्स ५४० तर डी-इंडेक्स ८८ इतका आहे. त्यांचे ६०० हून अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय शोधपत्रिकांतून प्रसिद्ध झाले असून, त्यांच्या संशोधनास ३३,८८० सायटेशन्स मिळाली आहेत. 'रिसर्च डॉट कॉम'ने २०२४ मध्ये विषयनिहाय जाहीर केलेल्या आकडेवारीमध्ये डॉ. पाटील यांना मटेरियल सायन्समध्ये देशातील पहिल्या १० संशोधकांमध्ये आणि जागतिक स्तरावर १५१२ वे स्थान मिळाले आहे. मटेरियल सायन्स हे आवडीचे संशोधनाचे क्षेत्र असल्यामुळे या क्षेत्रात दर्जेदार संशोधनकार्य करता आल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले.



डॉ. पाटील


'प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांचे यश त्यांच्या वैयक्तिक कठोर परिश्रमाचे द्योतक आहे. शिवाजी विद्यापीठ परिवारासाठी आणि एकूणच भारतीय विज्ञान क्षेत्रासाठीही अभिमानास्पद बाब आहे,' असे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 JUN 2025
पुण्यनगरी

# 'टॉप टेन' संशोधकांत प्र-कुलगुरू डॉ. पाटील

**कोल्हापूर :** मटेरियल सायन्स या विषयामध्ये देशातील आघाडीच्या दहा संशोधकांमध्ये शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू तथा जागतिक कीर्तीचे संशोधक डॉ. प्रमोद पाटील यांचा समावेश झाला आहे. रिसर्च डॉट कॉम या संशोधन मंचाने सन २०२४ ची विविध विषयांतील जागतिक आघाडीच्या संशोधकांची यादी नुकतीच जाहीर केली. त्यामध्ये डॉ. पाटील मटेरियल सायन्समधील संशोधनात देशात नवव्या स्थानी आहेत.

मटेरियल सायन्समधील संशोधनाच्या अनुषंगाने त्यांचे विविध संशोधकीय निर्देशांक हे खूप उच्च दर्जाचे आहेत. त्यांच्या संशोधनाचा एच-इंडेक्स ९४, आय-१० इंडेक्स ५४०, तर डी-इंडेक्स ८८ इतका आहे. त्यांचे ६०० हून अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय शोधपत्रिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या संशोधनास ३३,८८० सायटेशन्स मिळाली आहेत. अर्थात तितक्या संशोधकांनी डॉ. पाटील यांच्या शोधनिबंधांचे संदर्भ आपल्या संशोधनात दिले आहेत. रिसर्च डॉट कॉमच्या आकडेवारीमध्ये त्यांना देशातील पहिल्या १० आणि जागतिक स्तरावर १५१२ वे स्थान प्राप्त झाले.



अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केलेल्या जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांच्या यादीतही त्यांचे स्थान खूप वरचे आहे, तर ए.डी. सायंटिफिक निर्देशांक आकडेवारीतही त्यांचा समावेश आहे. प्र-कुलगुरू डॉ. पाटील शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक असून, ते मटेरियल सायन्सच्या क्षेत्रात गेल्या ३५ वर्षांपासून उत्कृष्ट अध्यापन व संशोधन करत आहेत. त्यांचे संशोधन प्रामुख्याने नॅनो मटेरियल्स, थीन फिल्म्स आणि ऊर्जा साठवणुकीच्या क्षेत्रात आहे. त्यांच्या संशोधनाचा उपयोग सौरऊर्जा, बॅटरीज आणि सेन्सर्स यासारख्या अनेक महत्त्वाच्या उपकरणांमध्ये होतो.

महा न्यूज अँड व्ह्यूज

वामाक्षी
Hanuman Nagar, ITI-Pachgaon Road,
Front of Nimish Corner Appartment, Kolhapur
Mob.- 9175089609

# मटेरियल सायन्समध्ये देशातील 'टॉप-१०' संशोधकांत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचा समावेश

**कोल्हापूर ( महान्यूज अँड व्ह्यूज):**

मटेरियल सायन्स या विषयामध्ये देशातील आघाडीच्या दहा संशोधकांमध्ये शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू तथा जागतिक कीर्तीचे संशोधक डॉ. प्रमोद पाटील यांचा समावेश झाला आहे. 'रिसर्च डॉट कॉम' या संशोधन मंचाने सन २०२४ ची विविध विषयांतील जागतिक आघाडीच्या संशोधकांची यादी नुकतीच जाहीर केली. त्यामध्ये डॉ. पाटील मटेरियल सायन्समधील संशोधनात देशात नवव्या स्थानी आहेत.

मटेरियल सायन्समधील संशोधनाच्या अनुषंगाने प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांचे विविध संशोधकीय निर्देशांक हे खूप उच्च दर्जाचे आहेत. त्यांच्या संशोधनाचा एच-इंडेक्स ९४, आय-१० इंडेक्स ५४० तर डी-इंडेक्स ८८ इतका आहे. त्यांचे ६०० हून अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय शोधपत्रिकांतून प्रसिद्ध झाले असून त्यांच्या संशोधनास ३३,८८० सायटेशन्स मिळाली आहेत. अर्थात तितक्या संशोधकांनी डॉ. पाटील यांच्या शोधनिबंधांचे संदर्भ आपल्या संशोधनात दिले आहेत. रिसर्च डॉट कॉमने सन २०२४मध्ये विषयनिहाय जाहीर केलेल्या आकडेवारीमध्ये डॉ. पाटील यांना मटेरियल सायन्समध्ये देशातील पहिल्या १० संशोधकांमध्ये आणि जागतिक स्तरावर १५१२ वे स्थान प्राप्त झाले आहे. डॉ. पाटील यांचे सातत्यपूर्ण आणि गुणवत्तापूर्ण संशोधन यामुळे ही कामगिरी साध्य झाली आहे. अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केलेल्या जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांच्या यादीतही त्यांचे नाव खूप वरती आहे, तर ए.डी. सायंटिफिक निर्देशांक आकडेवारीतही त्यांचा समावेश आहे.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक असून त्यांनी मटेरियल सायन्सच्या क्षेत्रात गेल्या ३५ वर्षांपासून उत्कृष्ट अध्यापन व संशोधन करीत आहेत. डॉ. पाटील यांचे संशोधन प्रामुख्याने नॅनोमटेरियल्स (nano-materials), थिन फिल्म्स (thin films) आणि ऊर्जा साठवणुकीच्या (energy storage) क्षेत्रात आहे. ही क्षेत्रे आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासासाठी अत्यंत मूलभूत मानली जातात आणि त्यांचा दैनंदिन जीवनावर मोठा प्रभाव पडतो. त्यांच्या संशोधनाचा उपयोग सौर ऊर्जा (solar energy), बॅटरीज



(batteries) आणि सेन्सर्स (sensors) यांसारख्या अनेक महत्त्वाच्या उपकरणांमध्ये होतो. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी पीएच.डी. संशोधन यशस्वीपणे पूर्ण केले आहे. त्यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यामध्ये जर्मनीची डॅड फेलोशिप, इंग्लंडची इन्स्टिट्यूट ऑफ फिजिक्सची फेलोशिप व दक्षिण कोरियाची ब्रेन पूल यांचा समावेश आहे. शिवाजी विद्यापीठाने २०१४ मध्ये गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन गौरविले आहे. नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्स इंडिया, अलाहाबाद आणि महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्स यांचे ते फेलो आहेत. त्यांची चार आंतरराष्ट्रीय पुस्तके प्रकाशित असून त्यांच्या नावावर सात पेटंटही आहेत.

**'रिसर्च डॉट कॉम' विषयी...**

'रिसर्च डॉट कॉम' हा जागतिक स्तरावरील अत्यंत प्रतिष्ठित संशोधन डेटा मंच आहे; जो जगभरातील महत्त्वाच्या संशोधकांची त्यांच्या क्षेत्रातील योगदानानुसार क्रमवारी लावतो. ही क्रमवारी अत्यंत पारदर्शक आणि कठोर वैज्ञानिक निकषांवर आधारित असल्याने तिला जागतिक मान्यता आहे. क्रमवारी ठरवताना संशोधकांच्या प्रकाशित शोधनिबंधांची संख्या, त्यांना प्राप्त सायटेशन्स (citations) आणि एच-इंडेक्स (h-index) यांसारख्या प्रमुख वैज्ञानिक निकषांचा विचार केला जातो. 'एच-इंडेक्स' हे संशोधकाच्या प्रकाशित शोधनिबंधांची संख्या आणि त्यांना मिळालेल्या सायटेशन्सची गुणवत्ता व प्रमाण दर्शवणारे एक महत्त्वाचे परिमाण आहे. उच्च एच-इंडेक्स म्हणजे संशोधकाचे कार्य मोठ्या प्रमाणावर वाचले जाते, संदर्भित केले जाते आणि त्याचा वैज्ञानिक समुदायावर व्यापक प्रभाव असे समीकरण असते. तर, 'डी-इंडेक्स' (D-index) (डिसिप्लीन इंडेक्स) हे संशोधकाच्या एखाद्या विशिष्ट अभ्यासक्षेत्रातील संशोधन कार्य आणि त्याच्या प्रभावाचे मूल्यांकन करण्यासाठी वापरले जाणारे मापन आहे. म्हणजे डॉ. पाटील हे मटेरियल सायन्समध्ये संशोधन करतात, तर त्यांच्या डी-इंडेक्ससाठी मटेरियल सायन्सशी संबंधित शोधनिबंधांचाच विचार येथे केला जातो.

एखाद्या वैज्ञानिकाला टॉप मानण्यासाठी आवश्यक असलेला किमान डी-इंडेक्स मूल्य प्रत्येक विषयानुसार (discipline) लक्षणीयरीत्या बदलू शकते. ही मर्यादा साधारणपणे त्या क्षेत्रातील एकूण वैज्ञानिकांच्या संख्येवर आधारित असते, जेणेकरून आघाडीच्या एक टक्का वैज्ञानिकांचा क्रमवारीत समावेश होईल. मटेरियल सायन्समध्ये ४० चा डी-इंडेक्स ही सामान्यतः एक मर्यादा मानली जाते.

मटेरियल सायन्समध्ये संशोधनाच्या व्यापक संधी: डॉ. प्रमोद पाटील

मटेरियल सायन्स हे माझ्या आवडीचे संशोधनाचे क्षेत्र असल्यामुळे या क्षेत्रात दर्जेदार संशोधनकार्य करता आले. त्या कामाचे हे फलित आहे. मात्र, आकडेवारीपेक्षा सातत्यपूर्ण संशोधन करीत राहणे हे मला महत्त्वाचे वाटते. मटेरियल सायन्सच्या क्षेत्रात संशोधनाच्या व्यापक संधी असून यापुढील काळातही त्यामध्ये अधिकाधिक संशोधन करीत राहण्याचा प्रयत्न राहील. शिवाजी विद्यापीठ या क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर आघाडीवर आहे. ही आघाडी टिकविण्यासाठी नवसंशोधकांना प्रेरित करीत राहणे आवश्यक आहे, अशी भावना या निमित्ताने प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी व्यक्त केली.

**शिवाजी विद्यापीठाची प्रतिष्ठा वृद्धिंगत: कुलगुरू डॉ. शिर्के**

प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या कामगिरीबद्दल आनंद व्यक्त करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, डॉ. पाटील यांचे यश केवळ त्यांच्या वैयक्तिक कठोर परिश्रमाचे द्योतक नाही, तर शिवाजी विद्यापीठ परिवारासाठी आणि एकूणच भारतीय विज्ञान क्षेत्रासाठी अभिमानास्पद बाब आहे. त्यांच्या या यशामुळे शिवाजी विद्यापीठाची प्रतिष्ठा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर वृद्धिंगत झाली आहे. त्यांचे हे यश विद्यापीठातील युवा संशोधकांना दर्जेदार संशोधनासाठी प्रेरित करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज

वामाक्षी
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimiti Corner Appartment, Kolhapur.
Mob : 9175089609

# अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य एकमेवाद्वितिय आणि प्रेरक : कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के

## त्रिशताब्दी जयंतीनिमित्त विद्यापीठात दोन महत्त्वपूर्ण ग्रंथांचे प्रकाशन



**कोल्हापूर (महान्यूज ॲण्ड व्ह्यूज)**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे समग्र कार्य हे एकमेवाद्वितिय आणि प्रेरक असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वतीने डॉ. मच्छिंद्र गोफणे आणि डॉ. नीलेश शेळके लिखित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर: जीवन आणि कार्य' आणि दत्तात्रय भैरवनाथ घुटूगडे संपादित 'कोल्हापूर पुराभिलेखागारातील राजर्षी छत्रपती शाहू दप्तरातील होळकर रियासतीसंबंधी कागदपत्रांची सूची' अशा दोन ग्रंथांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्ताने विद्यापीठात विविध विचारवंत मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. पण ती व्याख्याने केवळ कार्यक्रम पत्रिकेपुरती न राहता त्या कार्यक्रमाच्या पाऊलखुणांचे जतन करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न म्हणजे डॉ. गोफणे आणि डॉ. शेळके यांचा ग्रंथ होय. नेटक्या संपादनामुळे हा ग्रंथ सुबक आणि वाचनीय झाला आहे. त्याचप्रमाणे दत्तात्रय घुटूगडे यांच्या कागदपत्र सूचीच्या संकलनामुळे करवीर संस्थान आणि इंदूर संस्थान यांच्या दरम्यान असणारे सहसंबंध सामोरे आले आहेत. विशेषतः राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी होळकर संस्थानाशी केलेला पत्रव्यवहार या द्वारे सामोरा आला आहे. संशोधकांना यामुळे एक वेगळे दालन या ग्रंथाने खुले करून दिले आहे. त्यामुळे सर्वच लेखक, संपादक अभिनंदनास पात्र असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

यावेळी डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, विद्यापीठाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासनाने अवघ्या दीड वर्षात केलेले हे ग्रंथनिर्मितीचे कार्य मौलिक आहे. याद्वारे मराठेशाहीच्या अलक्षित इतिहासाचे जागरण झाले आहे, ही महत्त्वाची बाब आहे.

कार्यक्रमात स्वागत व प्रास्ताविक अध्यानाचे समन्वयक डॉ. मच्छिंद्र गोफणे यांनी केले. दत्तात्रय घुटूगडे यांनी आभार मानले.

यावेळी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीत कुलगुरू डॉ. शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, डॉ. नीलेश शेळके, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. जी. बी. कोळेकर, अविनाश भाले, डॉ. जयवंत भोसले, डॉ. किशोर खिलारे, यश आंबोळे यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

0 4 JUN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर







कोल्हापूर : सकाळ माध्यम समूहातर्फे आयोजित 'यिन समर यूथ समीट-२०२५'च्या उद्‍घाटनप्रसंगी मंगळवारी खासदार धैर्यशील माने यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी डावीकडून विनायक भोसले, राजकुमार पाटील, यतीश शहा, निखिल पंडितराव, पी. एस. पाटील, समीर सावरकर, पियू धनवडे उपस्थित होते. समोर 'सकाळ' यिन समर यूथ समीटमध्ये सहभागी तरुणाई. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

# समाजसेवेची तळमळ देईल जीवनाला दिशा

## काडसिद्धेश्वर महाराज : 'सकाळ' यिन समर यूथ समीटमध्ये तरुणाईला दिला सेवेचा मंत्र

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ३ : "समाजासाठी काम करण्याची तळमळच सध्या तरुणाईच्या जीवनाला नवी दिशा देणार आहे. यामुळे समाजसेवेची भावना कायम मनात तेवत ठेवा," असा संदेश कणेरीमठाचे मठाधिपती श्री काडसिद्धेश्वर महाराज यांनी तरुणाईला दिला. 'यिन'च्या समर यूथ समीटच्या पहिल्यादिवशी त्यांनी तरुणाईला आध्यात्माविषयी मार्गदर्शन केले. शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहात झालेल्या समर समीटमध्ये त्यांनी चौथे पुष्प गुंफले.**



ते म्हणाले, "अध्यात्म म्हणजे आत्म्याचे अध्ययन. ज्यांच्यामुळे शरीरातील सर्व क्रिया चालतात, असा आत्मा. यामुळे प्रथम प्राधान्य हे आत्म्याला दिले पाहिजे. प्रत्येक व्यक्ती स्वतःवर प्रेम करते, म्हणजे ती आत्म्यावर प्रेम करते. आत्म्यापर्यंत पोहोचायचे असेल तर चार मार्ग आहेत. योग मार्ग, कर्मयोग मार्ग, प्रीती मार्ग आणि उपनिषिद मार्ग. मात्र, याहून सुंदर आणखी एक मार्ग आहे तो म्हणजे सेवाभाव. निसर्गातील प्रत्येक सजीव निसर्गाला परत काहीतरी देण्याचे कर्म करते. केवळ मनुष्यच सर्वांचे शोषण करतो. या जीवसृष्टीवर लाखो जीवांचा समान हक्क आहे. यामुळेच इतर सजीवांप्रमाणे मानवानेही आपण काय समाजाला, राष्ट्राला देऊ शकतो, याचा विचार केला पाहिजे. वयोवृद्ध, अनाथ मुले, मुकी जनावरे, निसर्ग यांच्या सुकर जगण्यासाठी आपण एक कारण बनलो तरच आपले जीवन सार्थ ठरेल."

### दया असेल तर सेवा जमेल

आपल्या देशासाठी, समाजासाठी आपण देणे लागतो. काहीजण गरीब आहेत, काहीजण श्रीमंत आहेत. यामुळे केवळ आर्थिक स्वरूपात मदत देणे, म्हणजे केवळ मदत नव्हे, तर सेवेच्या माध्यमातूनही वंचितांच्या आयुष्यात आनंद आणू शकतो. तुमच्या मनात दयाभाव असेल तरच तुम्हाला सेवा करणे जमेल, यामुळे दयाधर्म स्वीकारा, असा संदेश काडसिद्धेश्वर महाराजांनी तरुणाईला दिला.